# आपत्ती व्यवस्थापनात समाजकार्याची भुमिका

**डॉ. चंदु रामभाऊ पाटील**
सहाय्यक प्राद्यापक
आठवले समाजकार्य महाविद्यालय, भंडारा
मो. नं. ९८२२६४११२७

***सारांश :***

*आपत्ती व्यवस्थापन हे कोणत्याही आपत्तीसाठी योग्य व सुसंगठीतपणे केलेले उपाय होय. पुर्वीच्या काळात नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन नैसर्गिक संकटे येऊन गेल्यावर करण्यात येत होते. आधुनिक काळात संकटाची आगाऊ सुचना देण्यासाठी अनेक तंत्रे उपलब्ध आहेत ही यंत्रणा पूर्वीपेक्षा अधिक खात्रीलायक असल्यामुळे संकटाची आगाऊ सूचना देऊ शकते. पण केवळ संकटाची सूचना योग्य तऱ्हेने देणारी यंत्रणा असुन चालणार नाही तर येणाऱ्या संकटांची तीव्रता कमी करण्याचे उपाय योजण्याची गरज आहे. यासाठी आपत्तीचे निराकरण करण्याची संकल्पना अंमलात आणली जाते. याकरिता व्यावसायीक समाजकार्याची भूमिका फार महत्वाची असते कारण समाजकार्याची भुमिका फार महत्वाची असते कारण समाजकार्याच्या पद्धतीचा वापर करून आपण वैयक्तीक, गटात, समुहामध्ये आणि राष्ट्रीय पातळीवर मदत करू शकतो. व्यावसायीक समाजकार्याचे शास्त्रयुक्त ज्ञान, कौशल्य आणि तंत्रांचे प्रशिक्षण घेतलेले समाजकार्यकर्ता हा परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या समास्या यांना चांगल्याप्रकारे हाताळु शकते.*

***संकेत शब्द :*** *आपत्ती व्यवस्थापन, व्यावसायीक समाजकार्य, प्रशिक्षण*

## प्रस्तावना :

आपत्ती हा समाजाच्या कार्यातील गंभीर असा व्यत्यय मानला जातो. यात व्यापक मानवी, भौतिक, आर्थिक किंवा पर्यावरणीय प्रभावाचा समावेश आहे. जो प्रभावित समुदाय किंवा समाजाच्या स्वत:च्या संसाधनाचा वापर करून सामना करण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त आहे. संयुक्त राष्ट्रांनी १९९० चे दशक हे नैसर्गिक आपत्ती निवारण्यासाठी आंतरराष्ट्रीय दशक ( INTERNATIONAL DECADE FOR NATURAL DISASTER REDUCTION - IDNDR ) म्हणुन निवडले १९९५ मध्ये भारतातील आपत्ती व्यवस्थापनासाठी नाममात्र जबाबदार असलेल्या कृषी आणि सहकार मंत्रालयाने नॅशनल सेंटर फॉर डिझास्टर मॅनेजमेंटची स्थापना केली. जी गृह मंत्रालयाकडे हस्तांतरीत करण्यात आली आणि ते केंद्र राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था म्हणुन ओळखले जाते. आपत्ती व्यवस्थापन : संकटग्रस्त भागातील लोकांचे स्थलांतर करणे, नैसर्गिक संकटाची सुचना देणे, शोध व बचावकार्य, दुर संचार प्रणाली, अग्निशमन, सहाय्यता व निवारा, आरोग्य व मनोवैज्ञानिक चिकित्सा यांसारख्या अनेक गोष्टींचे व्यवस्थापन अंतर्भूत असते. मानवी कृत्यांमुळे संकटे नेहमी येत राहतात. हया नैसर्गिक गोष्टी पर्यावरणाचा एक भाग आहेत. या नैसर्गिक संकटामुळे प्रभावित होणारी

जनता या संकटांचा सामना करण्यासाठी मानसिकरित्या तयार असेल तर अशा नैसर्गिक संकटामुळे होणारे नुकसान कमी करता येऊ शकते.

आपत्तीचे मुख्यत: चार प्रकार आहे. ते खालीलप्रमाणे आहे.

- नैसर्गिक आपत्ती : यामध्ये पुर,चक्रीवादळ,भुकंप आणि ज्वालामुखीचा उद्रेक यांचा समावेश होतो आणि दुय्यम परिणाम, भुस्खलन, आग, सुनामी यांचा समावेश होतो.
- पर्यावरणीय आणिबाणी : ज्यामध्ये सामान्यत: घातक सामग्रीचे उत्पादन वापर किंवा वाहतुक समाविष्ट असते आणि जिथे ही सामग्री तयार केली जाते आणि मानवामुळे जंगलात लागलेली आग असते.
- जटील आणिबाणी : याचा अर्थ असा आहे कि, संघर्षाची परिस्थिती आणि युध्दासह, लुटमार करणे आणि हल्लें करणे
- साथीची आणिबाणी : साथीच्या आणिबाणीमध्ये अचानक संसर्गजन्य रोगाचा समावेश होतो. सेवा आणि व्यवसायांमध्ये व्यत्यय येतो, आर्थिक आणि सामाजिक खर्च येतो.

**समाजकार्याची भुमिका :**

समाजकार्य व्यावसायिकांना विविध मानवी चुकांमुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे उद्‌भवण—या परिस्थिती आणि समस्यांना सामोरे जाण्यासाठी वैज्ञानिक ज्ञान, कौशल्ये आणि तंत्रे असलेले प्रशिक्षीत केले जाते. शास्त्रोक्त पद्धतीने सिध्दांत आणि सरावाव्दारे शिक्षण आएि प्रशिक्षण घेत असतांना त्यांना अप्रिय घटना हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते. ते समस्या ओळखतात आणि आपत्ती परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी कोणत्या प्रकारची समाजकार्य पद्धत लागु होऊ शकते. व्यावसायिक समाजकार्यकर्ते सरकारी आणि सामुदायिक सज्जतेवर किंवा खाजगी व्यवसाय सज्जतेवर लक्ष केंद्रीत करू शकतात. शिक्षण आणि प्रशिक्षण फेडरल आणि खाजगी संस्थाद्वारे चालवल्या जाणा—या समाजकार्य महाविदयालयाद्वारे प्रदान केले जाते आणि सार्वजनिक माहिती आणि मध्यम संबंधापासुन ते उच्च स्तरीय घटना आदेश आणि रणनीतिक कौशल्ये यांच्या श्रेणीमध्ये असतात. भुतकाळात आपातकालीन व्यवस्थापनाचे क्षेत्र मुख्यत: लष्करी किंवा प्रथम प्रतिसाद देणा—या पार्श्वभूमी असलेल्या लोकांद्‌वारे भरलेले आहे. सध्या हे क्षेत्र अधिक वैविध्यपुर्ण बनले आहे. अनेक समाजकार्यकर्ते लष्करी किंवा प्रथम प्रतिसाद देणा—या क्षेत्राव्यतिरिक्त विविध पार्श्वभूमीतुन आलेले आहेत. आपत्ती व्यवस्थापनातील विशेषकरणासह समाजकार्यात पदव्युत्तर पदवी मिळवणा—यांसाठी शैक्षणिक संधी वाढत आहेत.
समाजकार्याचा व्यापक अर्थ एखादया व्यक्तीला स्वत:ला मदत करण्यासाठी मदत करणे असा आहे. समाजकार्य एखादया व्यक्ती, गट आणि समुदायाच्या समस्या हाताळते. तथापी आपत्ती व्यवस्थापनाची समस्या हाताळतांना समाजकार्य हस्तक्षेप धोरणे खालील तीन वेगवेगळया भागांमध्ये विभागली गेली आहेत.

भाग एक मध्ये आपत्ती आणिबाणीच्या गरजेच्या स्वरुपाच्या आधारावर समाजकार्य हस्तक्षेप हे आहे.

भाग दोन मध्ये समाजकार्याचा हस्तक्षेप आणि आपत्ती व्यवस्थापनामध्ये विविध संस्थांचा सहभाग आहे.

भाग तीन मध्ये उच्च शिक्षणातील आपत्ती व्यवस्थापना प्रस्तावित मॉडल पदव्युतर समाजकार्य भाग –२ अभ्यासक्रमात आहे.

**निष्कर्ष :**

आपत्ती ही केवळ भौगोलिकच नाही तर सामाजिक समस्यापण आहे.कारण यामध्ये नैसर्गिक व अनैसर्गिक अशा दोन्ही संकटाना तोंड द्यावे लागते.निसर्गाचे नियम टाळता येत नाहीत, तरीही निसर्ग जसा आहे तसा ठेवण्याचा प्रयत्न करता येतो,त्यासाठी राष्ट्रीय धोरणही बनवले आहे. सध्या येणा–या आपत्तींना तोंड देण्यासाठी त्याच माध्यमातुन आपत्ती व्यवस्थापन केले जात आहे. यासोबतच भौगोलिक वातावरण सुरळीत ठेवुन काही महत्वाची पावले उचलण्यासाठी पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ देखील या कार्यक्रमासाठी पारीत करण्यात आला. आपत्ती व्यवस्थापनामध्ये पद्धतशीर अभ्यास करुन अंदाज बांधता येतो. त्यासाठी यादी तयार करुन संवेदनशिल माहीती देणे आणि नैसर्गिक आपत्तीत काम यासारख्या आपत्तीनंतर सुरक्षीत स्थळी नेणे आदी कामे करणे. योग्य पाउल असेल.त्यामुळे आपत्ती हे मुख्य उद्दिष्ट मानुन योग्य व्यवस्थापन करता येते.

**संदर्भ ग्रंथ :**


- Gupta, Harsh. K. (ed) ( 2003 ). Diasater Management, Universities Press.
- भरूचा, एरक.( 2013 ).पर्यावरण शास्त्र. Universities Press (India) Pvt. Ltd.
- Patil, K.S.(ed) (2014). DISASTER MANAGEMENT IN HIGHER EDUCATION. NAGPUR:BSPK BOOK Publishing Company .
- कार्लेकर, श्रीकांत.(2006). पर्यावरण समस्या,निवारण व क्षेत्र अभ्यास.पुणे: डायमंड पब्लिकेशन.